**( या शासन निर्णयामध्ये खालील शासन निर्णय समाविष्ट करण्यात आलेला आहे.**
**१. शासन नगर विकास विभाग निर्णय क्र. जीईएन १०८७/२५७३/सीआर ६२/८९/नवि-१४, दि. ११ जून १९९०)**

---

महाराष्ट्र शासन
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**
**शासन निर्णय क्रमांक : जीईएन १०८७/२५७३/सीआर ६२/८९/नवि-१४,**
**दिनांक ३० नोव्हेंबर, १९८९**

पूर्वपिठिका

सध्या नगरपालिका आपल्या हद्दीत जी बांधकामे करतात, उदा.शाळा, पूल, रस्ते, समाजमंदिर, दवाखाना इत्यादिंसाठी ``अ``व ``ब`` वर्ग नगरपालिकांना रु.२०,०००/- पेक्षा जास्त व ``क`` वर्ग नगरपालिकांना रु. १०,०००/- पेक्षा जास्त अंदाजपत्रक असलेल्या कामासाठी तांत्रिक मंजूरी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ च्या कलम ७२ अन्वये शासकीय विभागाकडून घ्यावी लागते.

२. सध्या अशा प्रकारची तांत्रिक मंजूरी महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून दिली जाते. या संदर्भात मंडळाने शासनाकडे प्रस्ताव पाठविला की, मंडळाकडे पाणीपुरवठा व जलनि:सारण योजनांची कामे फार मोठया प्रमाणावर असतात. त्यामुळे त्यांना नगरपालिकांच्या पाणीपुरवठा व जलनि:सारणाच्या कामाव्यतिरिक्त इतर बांधकामांना तांत्रिक मंजूरी देणे शक्य होत नाही. तसेच त्यांनी असे प्रतिपादित केले की, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळ हे आता स्वतंत्र झाले असल्यामुळे त्यांच्याकडून हे तांत्रिक मंजरीचे काम काढून घेण्यांत यावे. शासनाने यावर असे आदेश दिले आहेत की, जोपर्यंत पर्यायी व्यवस्था होत नाही, तोपर्यंत नगरपालिकांच्या बांधकामांना तांत्रिक मंजूरी देण्याचे काम मंडळाच्या अधिकाऱ्यांनी चालू ठेवावे.

**शासन निर्णय**

याबाबतीत विचारांती नगरपालिकांच्या बांधकामांना तांत्रिक मंजूरी देण्याच्या प्रश्नाबद्दल शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) ``अ``व ``ब`` वर्ग नगरपालिकांच्या बांधकामांना तांत्रिक मंजूरी देण्याचे काम पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पूर्वीप्रमाणेच चालू ठेवावे.

२) ``क`` वर्ग नगरपालिकांकडे करावयाच्या बांधकामांचे नकाशे व प्राकलने त्या जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीच्या परिच्छेद ३०० प्रमाणे अंशदान ठेवीच्या तत्वावर तयार करुन घ्यावी व त्यांनीच त्यांना तांत्रिक मंजूरी द्यावी. यासाठी प्रचलित नियमानुसार लागणारी फी संबंधित नगरपालिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आगाऊ जमा करावी.

३) ``क`` वर्ग नगरपालिकांची बांधकामे ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीच्या परिच्छेद ३०० प्रमाणे अंशदान ठेवीच्या तत्वावर करुन द्यावी. त्यासाठी प्रचलित नियमानुसार लागणारा खर्च देखील नगरपालिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आगाऊ जमा करावा. मात्र अशा त-हेने एका आर्थिक वर्षात एका नगरपालिकेची रु.५ लाख पर्यंतची बांधकामेच सार्वजनिक बांधकाम विभागाने करुन द्यावी.

४) ``क`` वर्ग नगरपालिकांनी तांत्रिक मंजूरी ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घ्यावी. तथापि बांधकामे मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनच करुन घेणे त्यांना सक्तीचे किंवा बंधनकारक नाही. आपली बांधकामे कशा प्रकारे व कोणाकडून करुन घ्यावी यासाठी ``क`` वर्ग नगरपालिकांना मुभा देण्यांत येत आहे. **(दि. ११ जून १९९९० नुसार समाविष्ट)**

३.	हा शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम खात्याच्या व वित्त विभागाच्या अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्र.१७३४ दि.१.११.१९८९ व क्र.सीआर १३७२/व्यय-६ दिनांक २७.१०.१९८९ च्या सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(अ. पां.शहाणे)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति